प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दिनांक – २९ सप्टेंबर २०२२

**सिडकोची घणसोली आणि उलवे तसेच नैना क्षेत्र येथे अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई**

सिडकोतर्फे कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर सिडकोतर्फे कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार सिडकोतर्फे अनुक्रमे दि. २४, २६, २७ आणि २८ सप्टेंबर २०२२ रोजी सिडकोच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) हद्दीतील विचुंबे, उसर्ली, कोळखे आणि पालीदेवद येथे तर नवी मुंबईतील ठाणे जिल्ह्यातील सेक्टर-२१, घणसोली आणि रायगड जिल्ह्यातील सेक्टर-२, ३ व ५, उलवे येथे अनधिकृत बांधकामे विरोधी कारवाई करण्यात आली.

नैना क्षेत्रातील कारवाई अंतर्गत विचुंबे, उसर्ली व कोळखे येथील तात्पुरत्या स्वरूपातील खानवळी, भाजीपाला दुकाने, रोपवाटिका, भंगार सामानाचे दुकान आणि स्टॉल्स इ. अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. तसेच पनवेल-माथेरान मार्गावरील मौजे पालीदेवद येथील तात्पुरत्या स्वरूपातील मटण शॉप, चिकन शॉप, फुल व हारांचे स्टॉल, फळभाजांच्या हातगाड्या इ. अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

नवी मुंबईतील कारवाई दरम्यान घणसोली येथील सेक्टर-२१ मधील सिडकोच्या मालकीच्या १२.५% योजनेकरिता राखीव असलेल्या भूखंडावरील पक्क्या विटांचे बांधकाम व वरती सिमेंट पत्राशेड असलेले दोन अनधिकृत दुकाने/गाळे निष्कासित करण्यात आले. तसेच सेक्टर-२, ३ व ५, उलवे येथील सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आलेले अनधिकृत चिकन स्टॉल, गॅरेज, भंगार सामानाचे दुकान व इतर स्टॉल निष्कासित करण्यात आली.

वर नमूद अतिक्रमणे-अनधिकृत बांधकामे इ. सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून, सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होती व सिडको प्रशासनाने योग्य ती कायदेशीर प्रकिया अवलंबून सदर अतिक्रमणे निष्कासित केली.

नैना क्षेत्रातील कारवाई मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नैना) विभागातील अधिकारी, सिडकोतील सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली. नवी मुंबईतील कारवाई स्थानिक पोलीस कर्मचारी, सिडकोच्या मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकाम विभागातील अधिकारी, सिडकोचे पोलीस पथक, सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

नैना क्षेत्रातील कारवाईवेळी १० कामागार तैनात करण्यात येऊन १ जेसीबी आणि २ जीप या साधनांचा वापर करण्यात आला. घणसोली येथील कारवाई पार पाडतेवेळी १० कामगार तैनात करण्यात येऊन १ जेसीबी आणि ३ जीप या साधनांचा वापर करण्यात आला, तर उलवे येथील कारवाईदरम्यान १० कामगार तैनात करण्यात येऊन १ जेसीबी आणि १ जीप या साधनांचा वापर करण्यात आला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको